# मेट्रो-३ प्रकल्पाचे ९७ टक्के भुयारीकरण

## महालक्ष्मी मेट्रो स्थानकातील ४० वा टप्पा पूर्ण; खडतर आव्हानांवर मात

मुंबई, ता. ८ : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (एमएमआरसी) राबवण्यात येत असलेल्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गाचे भुयारीकरणाचे ९७ टक्के काम पूर्ण झाले आहे. या मार्गावरील महालक्ष्मी मेट्रो स्थानकातील भुयारीकरणाचा ४० वा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण झाला.



'तानसा-१' या टनेल बोरिंग मशीनद्वारे सायन्स म्युझियम मेट्रो स्थानक ते महालक्ष्मी मेट्रो स्थानक हा डाऊन-लाईन मार्गाचा १,१३५.५ मीटर भुयारीकरणाचा टप्पा एकूण ७५७ रिंगच्या साह्याने ३२५ दिवसांत पूर्ण करण्यात आला. मेट्रो-३ मार्गिकेतील पॅकेज-३ मध्ये पाच स्थानके असून हा या मार्गिकेतील सर्वात लांब टप्पा आहे. यामध्ये मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक आणि वरळी मेट्रो स्थानकांचा समावेश आहे.

सायन्स म्युझियम ते महालक्ष्मी स्थानकादरम्यान भुयारीकरण करणे अतिशय आव्हानात्मक होते. या टप्प्यातील भुयारीकरण पश्चिम रेल्वे मार्गावरील महालक्ष्मी आणि लोअर परेल रेल्वे स्थानकांच्या दरम्यान थेट रेल्वेमार्गाच्या खालून करण्यात आले आहे. याशिवाय हे बोगदे जेकब सर्कल येथील पालिकेच्या १७ मीटर खोल पंपिंग स्टेशनच्या जवळ आहेत. त्यामुळे येथे भुयारीकरण करणे जिकिरीचे होते; मात्र ते काम यशस्वीपणे पूर्ण केल्याचे एमएमआरसीचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांनी सांगितले.